www.esakal.com
सकाळ
Today सातारा
सकाळ
शुक्रवार, १४ सप्टेंबर २०१८ | ४

भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव



सातारा : आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात बोलताना डॉ. विजयसिंह सावंत. त्यावेळी डॉ. व्ही. एस. नलवडे, नजमा मणेर व अन्य.

# शिक्षकाने कृतिशील, निष्ठावान असले पाहिजे : डॉ. सावंत

**सातारा, ता. १३ :** शिक्षकाने कृतिशील आणि निष्ठावान असले पाहिले, अशी अपेक्षा रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी व्यक्त केली.

येथील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शिक्षक दिनानिमित्त नुकत्याच झालेल्या कार्यक्रमास गुणवंत विद्यार्थी, खेळाडू, माजी प्राचार्य, प्राध्यापक, सेवक, खेळाडू व पीएच. डी. मार्गदर्शकांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्राचार्य सावंत यांनी भारतीय संस्कृतीतील गुरुंचे महत्त्व सांगितले. माजी प्राचार्या नजमा मणेर यांनीही मार्गदर्शन केले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. जी. एस. कांबळे यांनी प्रास्ताविकात शिक्षक दिन व कॉलेजमधील उपक्रमांची माहिती दिली. श्रीमती एन. के. नांगरे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्या डॉ. व्ही. एस. नलवडे यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. डॉ. शिकलगार यांनी आभार मानले.